# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना कमांक २००७/(३२२/०७) विशि—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६)व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

( परीक्षा विभाग )

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली—४४२६०५

फोन नंबर ०७१३२—२२३१०४

जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/3843 २०१८ दि. १३/११/२०१८

## परिपत्रक

**विषय:—** सन २०१८—१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृष्य तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्याचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

**संदर्भ :—** मा. शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) पुणे यांचे पत्र क्रं.उशिस.२०१८/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/१८६९०, दि. ०५/११/२०१८.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयीन प्राचार्य व सर्व सबंधिताना कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रान्वये राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्याची विद्यापीठ परीक्षा व परीक्षा मंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये अकृषी विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा समावेश आहे. शासन निर्णयान्वये महसुल व वन विभागाकडून राज्यातील सन २०१८—१९ च्या खरीप हंगाम Trigger-2 लागू केलेल्या काही तालुक्यामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. दृष्काळ सदृश्य परिस्थितीवर मात करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्याचे परीक्षा शुल्क माफीसंदर्भात तात्काळ कार्यवाही घ्यावयाची आहे.तसेच उपरोक्त संदर्भिय पत्रातील शासन निर्णयाचे अवलोकन करुन मा. शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,पुणे यांना संलग्नीत केलेल्या विवरण पत्र—अ मध्ये माहीती सादर करण्यात यावी. तसेच विवरण पत्राची एक प्रत विद्यापीठात सादर करण्यात यावी.

सहपत्र:— संदर्भिय पत्र व विवरणपत्र — अ.

13/11/2018

( डॉ. अनिल झेड. चिताडे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी माहितीस्तव अग्रेषीत:—

१. मा. कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठात, गडचिरोली.
२. मा. प्र—कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोलीशी संलग्नीत सर्व महाविद्यालये.
४. संगणक विभाग सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करावे.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे कार्यालय
आवक क्र. 8494 दि. 12/11/18
जावक क्र. दि.

9207 12/11/18

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११९५३

क्र.उशिस-२०१८/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/18690 दिनांक- 05 NOV 2018

प्रति,
१ सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२ कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय- सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ- १ शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय, क्र.एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दिनांक २८/१०/१९९३
२ महसुल व वन विभाग शासन निर्णय, क्र.एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८.
३ महसुल व वन विभाग शासन निर्णय, क्र.एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८.
४ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शुल्क-५२१८/प्र.क्र.४१३/मशि-२, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१८.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा व परीक्षा मंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये अकृषी विद्यापीठाकडून घेण्यात येणा-या परीक्षांचा समावेश आहे. आता उपरोक्त संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये महसुल व वन विभागाकडून राज्यातील सन २०१८-१९ च्या खरीप हंगाम Trigger-२ लागू केलेल्या तालुक्यांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागु केलेली आहे. यास्तव सदर १८० तालुक्यामधील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीसंदर्भात तात्काळ कार्यवाही करावयाची आहे. त्यानुसार आपल्या अधिनस्त संबंधित दुष्काळ सदृश्य तालुक्यातील महाविद्यालयांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात याव्यात.

१ संदर्भ क्र.१ येथील १८ ऑक्टोबर, १९९३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील सवलतीस पात्र असणा-या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदनपत्रे विद्यापीठाकडे संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रमाणपत्रावर साक्षांकित करुन पाठवावे.

२ सद्यस्थितीत विद्यापीठांचे पहिले शैक्षणिक सत्र संपलेले असल्याने महाविद्यालयाने त्यांचे महाविद्यालयात सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रकमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदनापत्रावरुन

AR (Exam)
तात्काळ कार्यवाही व्हावी
12/11/18

D:\April 16\Exam Fees.docx

Scanned by CamScanner

प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कार्यालयाकडे आवश्यक रकमेची मागणी करावी

३ तसेच विद्यापीठाने आपल्याकडे प्राप्त झालेल्या सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्ती करण्यासाठी महाविद्यालय निहाय आलेल्या आवेदनपत्रावरुन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कार्यालयाकडे मागणी करावी. व सदर रक्कम महाविद्यालयामार्फत संबंधित लाभार्थ्यांस परत करण्यात यावी.

४ विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, यांनी महाविद्यालयाकडून/विद्यापीठाकडून आलेल्या माहितीची तपासणी करुन आवश्यक रकमेची माहिती संचालनालयाकडे सोबतच्या विवरणपत्र-अ मध्ये सादर करावी. सदरची माहिती सादर केल्यानंतर संचालक स्तरावरुन सहसंचालक कार्यालयांना सदर योजनेसाठी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल व सहसंचालक स्तरावरुन संबंधित रकमेची प्रतिपुर्ती करण्यात येईल.

५ कोणत्याही परिस्थीतीत दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned by CamScanner

विवरणपत्र-अ

सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशीलाचे विवरणपत्र

| अ.क्र. | सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्तीसाठी आवश्यक रक्कम (रुपये) | सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्तीसाठी आवश्यक रक्कम (रुपये) | एकूण विद्यार्थी संख्या | एकूण प्रतिपुर्तीची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

स्वाक्षरी

Scanned by CamScanner